सकाळ | eSakal.com BETA

# सॅन होजे गावी रंगणार 'दुर्गा झाली गौरी'

Wednesday, September 23rd, 2009 AT 1:09 PM



सुमारे 28 वर्षापूर्वी आविष्कार चंद्रशाळाने इतिहास घडवला. श्री. माधव साखरदांडे लिखित 'दुर्गा झाली गौरी" या नृत्यनाट्याचा प्रयोग गुरू रमेश पुरव यांच्या दिग्दर्शनाने, गुरू आचार्य पार्वतीकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शांकनील यांच्या मधुर संगीताने मोठ्या थाटामाटात सजला आणि रंगला. त्यानंतर गेली 28 वर्षे "दुर्गा झाली गौरी" चे शेकडो प्रयोग "आविष्कार'तर्फे आणि इतर अनेक हौशी नाट्यसंस्थांतर्फे जगभर सगळीकडे सादर होत आहेत. मराठी रंगभूमीवरचा हा एक चमत्कारच आहे. "दुर्गा झाली गौरी" यान नृत्यनाट्याची मोहिनी आजही अनके दिग्दर्शकांना आणि नृत्यदिग्दर्शकांना खुणावते. सॅन फ्रॅन्सिस्को बे एरिया स्थित कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन अर्थात "कला" या संस्थेने आता हे शिवधनुष्य उचलायचं ठरवलं आहे. "कला" तर्फे "दुर्गा झाली गौरी" चा प्रयोग 26 सप्टेंबर रोजी लॉस अल्टॉस हायस्कूलच्या ईगल थिएटरमध्ये आयोजित करण्यात आला आहेत.

"कला"च्या "दुर्गा झाली गौरी" च्या दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे विक्रम वाटवे यांनी तर नृत्यदिग्दर्शनाची जबाबदारी पेलत आहेत मोनिका मुटाटकर. विक्रव वाटवे हे मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टीतील प्रख्यात रंगकर्मी श्री. माधव वाटवे यांचे चिरंजीव.

त्यामुळे नाटकाचा आणि विक्रम वाटवे यांचा अगदी लहानपणापासूनचा संबंध. मराठी रंगभूमीवर एक प्रयोगशील लेखक-दिग्दर्शक म्हणून विक्रम वाटवे गेली दोन दशके काम करीत आहेत. त्यांनी "चंद्रपूरच्या जंगलात...?", "मुंबईचे कावळे", "सुवर्णमहोत्सवी स्वातंत्रदिन साजरा" अशा अनेक एकांकिका आणि नाटकांच्या लेखन-दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. सध्या व्यवसायानिमित्त अमेरिकेत राहत असूनही कामाच्या व्यापातून वेळ काढून ते "कला" संस्थेतर्फे एकांकिका आणि नाटकांचे दिग्दर्शन करीत असतात. नुकत्याच झालेल्या बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या वेस्टर्न रिजनल एकांकिका स्पर्धेत विक्रम वाटवे यांनी दिग्दर्शित केलेल्या श्री. योगेश सोमण लिखित "वन सेकंडस् लाइफ" या एकांकिकेला प्रथम पारितोषिक मिळाले.

नृत्यदिग्दर्शिका मोनिका मुटाटकर या गंधर्व महाविद्यालयाच्या नृत्य विशारद आहेत. महाराष्ट्रात कथ्थक आणि लोकनृत्य यांचा अभ्यास केल्यानंतर अमेरिकेत आल्यावर त्यांनी आधुनिक जॅझ आणि बॅले या नृत्यप्रकारांचेही शिक्षण घेतले. त्यांनीही बे एरियामध्ये कवी कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, अटबिहारी वाजपेयी यांच्या कवितांवर आधारित, तसेच "मायबोलीतील गाणी, अमुच्या अंगणी", "डान्सेस ऑफ इंडिया", "कृष्णरंग", "चिंटूची धमाल" अशा अनेक नृत्यनाटिकांची निर्मिती केली आहे. या वर्षी बे एरियात झालेल्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनात मोनिका मुटाटकर यांनी सादर केलेल्या "आम्ही मराठी" या कार्यक्रमाला प्रेक्षकांची भरभरून दाद मिळाली.

"कला" च्या "दुर्गा झाली गौरी" बद्दल बोलताना दिग्दर्शक विक्रम वाटवे म्हणाले, "गुरू रमेश पुरव आणि गुरू आचार्य पार्वतीकुमार यांनी मराठी रंगभूमीला दिलेल्या योगदानाबद्दल "कला" शतशः ऋणी आहे. मूळ प्रयोगातील सर्व बारकावे, सर्व नृत्यप्रकार, नृत्याविष्कार आणि त्यामागचा विचार जाणून घेऊन तो विचार तंतोतंत तसाच प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा ही केवळ अशक्यप्राय गोष्ट आहे याची आम्हाला जाणीव आहे. आमचा "दुर्गा झाली गौरी" चा प्रयोग हा इथल्या लहान-मोठ्या प्रेक्षकांची मानसिकता लक्षात घेऊन केलेला स्वतंत्र विचार असेल. तो मूळ कलाकृतीला आमच्यातर्फे केलेला मानाचा मुजरा असेल."'

बे एरियामध्ये अनेक वर्षे लहान मुलांसाठी नृत्याचे वर्ग घेणाऱ्या मोनिका मुटाटकर म्हणतात, ""लहान मुलांबरोबर काम करणं जितकं कठीण तितकच आनंददायी देखील असतं. इथल्या शाळांमध्ये जाणारी लहान मुलं इतर अनेक गोष्टीत भाग घेत असतात. त्यांचे पोहायचे वर्ग, चित्रकलेचे वर्ग, गाण्याचे वर्ग, सॉकर गेम्स अशा सगळ्या ठिकाणी त्यांची ने-आण करता करता आई-वडिलांची तारांबर उडालेली असते. पण ह्या सगळ्या गोष्टी सांभाळून ही मुलं जेव्हा भारतीय नृत्यकला शिकण्याचाही हट्ट धरतात तेव्हा खरंच खूप बरं वाटतं. "दुर्गा झाली गौरी" च्या निमित्ताने इथल्या लहान मुलांची आपल्याकडच्या राजा, राणी, राजकन्या, विदुषक, दासी, शिपाई अशा पात्रांशी ओळख झाली. इथल्या लहान मुलांच्या

डोळ्यासमोरची राणी किंवा विदुषकाची प्रतिमा आणि नाटकासाठी खास भारतातून आणलेले पोषाख यांची सांगड घालताना गंमत आली".

कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन ("कला") ही संस्था महाराष्ट्रातील आणि भारतातील नाट्य, संगीत आणि नृत्यकलाची आराधना आणि जोपासना करण्यात कार्यरत आहे. मराठी नाटके, संगीताचे आणि नृत्याचे कार्यक्रम आणि टी.व्ही. कार्यक्रमांची निर्मिती याचबरोबर "कला" दर्जेदार मराठी चित्रपटांचे प्रयोग आणि भारतातील सुप्रसिध्द नाटककार, लेखक, कवी आणि दिग्दर्शक यांच्याबरोबर मनमोकळ्या गप्पागोष्टी अशा कार्यक्रमांचे आयोजन करते. अभिरूचीसंपन्न नाट्यकृती, संगीत आणि नृत्याविष्काराबद्दल मनापासून तळमळ असलेले "कला" चे गुणी कलाकार हे सिलिकॉन व्हॅलीमध्ये आपापले व्यवसाय सांभाळून उत्तमोत्तम कार्यक्रम करीत असतात. या कार्यक्रमातून निर्माण होणारा सर्व निधी महाराष्ट्रातील आणि भारतातील दर्जेदार कलाकृती कायम स्वरूपात जतन करून ठेवण्यासाठी उपयोगात आणला जातो. गेल्या सात वर्षात "कला" ने ""सूर्य पाहिलेला माणूस", "आनंद ओवरी" या नाट्यपटांची आणि श्री. विजय तेंडुलकर यांच्यावरील "तेंडुलकर आणि हिंसा-काल आणि आज" या माहितीपटाची निर्मिती केली आहे तसेच श्री. सतीश आळेकर यांच्यावरील माहितीपटासाठी आर्थिक सहाय्य दिले आहे. थोडक्यात, "कला" चे ध्येय आहे - कलेमधून... कलेसाठी... कलारत रहायचं.

"कला" बद्दल अजून माहिती मिळवण्यासाठी आमच्या संकेतस्थळाला जरूर भेट द्या.
www.calaaonline.com